माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२११२२३/२१/अ.क्र.५८१८/२४/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२११२२१/२१/अ.क्र.५८१९/२४/०१**

**श्री. नयन नरसिभाई पुंभडीया**
रुम नं.४, प्रजापती कंपाऊंड, कादीरी गल्ली, काजूपाडा,
कादीरी कुर्ला-अंधेरी रोड, जरीमरी बस स्टॉप, मुंबई-४०० ०७२.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता पूर्व उपनगरे**
कार्यकारी अभियंता (उद्यान कक्ष) यांचे कार्यालय,
४ था मजला, हॉकर्स प्लाझा, सेनापती बापट मार्ग, दादर (प.), मुंबई-४०० ०२८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता पूर्व उपनगरे**
कार्यकारी अभियंता (उद्यान कक्ष) यांचे कार्यालय,
४ था मजला, हॉकर्स प्लाझा, सेनापती बापट मार्ग, दादर (प.), मुंबई-४०० ०२८.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.१२.२०२४</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित. ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. ०६.१२.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| अपील क्रमांक | मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| ५८१८ | २४.१२.२०१९ | - | ०२.१२.२०२० | - |
| ५८१९ | २४.१२.२०१९ | - | ०२.१२.२०२० | - |

अपिलकर्तांनी दि.१९.०३.२०२१ रोजी आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. २४.१२.२०१९ अन्वये "कुर्ला एल विभाग मधे लालबहादुर शास्त्री मार्ग वर फोजीया डोस्पीटल ला लागुन उधानाचे चालत असलेले व पुर्ण जालेले कामा बाबत चे कागदपत्र मीळणे बाबत आपल्या स्वात्यातुन करण्यात आलेले उधानाचे Hortical, Electrical, Maintenance a New Garden Development व ईतर कामाचे कांगदपत्र मीळणे बाबत" माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारींनी उत्तर न दिल्याने प्रथम अपिल अर्ज दि. ०२.१२.२०२० रोजी दाखल केला आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. १९.०३.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांना सुनावणी नोटीस प्राप्त असून कोणतीही पूर्व सूचना न देता दुसऱ्यांदा अनुपस्थित आहेत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपीलार्थी यांना सुनावणी नोटीस प्राप्त असून कोणतीही पूर्व सूचना न देता दुसऱ्यांदा अनुपस्थित असल्यामुळे त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्यात कोणतेही स्वारस्य दिसून येत नाही.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**वरील दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
26-12-2024

State Information Commission Maharashtra

**मुंबई** **( डॉ. प्रदीप व्यास )**
**दिनांक :२६.१२.२०२४** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**